पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
सामान्य प्रशासन विभाग
क्र :सा.प्र.वि/२/कावि/२६० /२०२४
दिनांक १२ /०४/२०२४

विषय :- अतिरिक्त कार्यभार सोपविण्याबाबत...

आदेश,

पिंपरी चिंचवड महानगरपालिका पशुवैद्यकीय विभागामार्फत पशुधनाचे जतन करणे तसेच सार्वजनिक आरोग्य वृध्दिंगत करण्याच्या माध्यमातून नीतीमुल्यांची जपणूक केली जाते. सद्यस्थितीत श्री.संदिप खोत, उपआयुक्त यांच्या अधिपत्याखाली व डॉ.अरूण मारूती दगडे, मुख्य पशुवैद्यकीय अधिकारी यांच्या नियंत्रणाखाली पशुवैद्यकीय विभागाचे कामकाज करण्यात येत आहे.

महापालिकेच्या पशुवैद्यकीय विभागांतर्गत, पशुवैद्यकीय आंतर रुग्ण विभाग, नेहरुनगर व महानगरपालिकेचे Animal birth control संबंधीत canine care and control या स्वयंसेवी संस्थेमार्फत काम करण्यात येते. सदर कामकाजावर डॉ.अरूण मारूती दगडे, मुख्य पशुवैद्यकीय अधिकारी यांचे नियंत्रण आहे.

तथापि, प्रशासकीय कामकाजाच्या सोयीच्या दृष्टीने श्री.संदिप खोत, उपआयुक्त व डॉ.अरूण मारूती दगडे, मुख्य पशुवैद्यकीय अधिकारी यांचेकडील उपरोक्त कामकाज निरस्त करण्यात येत असून सदर कामकाजाचे संपुर्ण नियंत्रण श्री.अमित पुरुषोत्तम पंडित, प्रशासन अधिकारी तथा प्र.क्षेत्रीय अधिकारी, ब क्षेत्रीय कार्यालय यांच्याकडे पुढील आदेश होईपर्यंत सोपविण्यात येत आहे.

श्री.अमित पुरुषोत्तम पंडित, प्रशासन अधिकारी तथा प्र.क्षेत्रीय अधिकारी यांनी यापुर्वी सोपविण्यात आलेल्या मुळ विभागाचे कामकाजासह उपरोक्त नमुद अतिरिक्त कार्यभार पहावा.

प्रस्तुत आदेशाचा अंमल तात्काळ लागू होईल.

(शेखर सिंह)
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

प्रति, सर्व संबंधित अधिकारी
प्रत, सर्व संबंधित विभाग